क्र.साप्रवि/रवका/गणवेष/न.क्र.७८१/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. २६६ दिनांक १४ / १२ / २००९

विषय : दक्षता संवर्गातील अधिकाऱ्यांच्या गणवेषाचा शिलाई दर, धुलाई भत्ता तसेच चामडी बुटाच्या व वुलन जर्सी इत्यादीच्या दरामध्ये वाढ करणेबाबत.

संदर्भ : सर्वसाधारण आदेश क्र.१३० दिनांक ०५.०२.१९९३

......

सर्वसाधारण आदेश क्र.१३० दिनांक ०५.०२.१९९३ अनुसार दक्षता संवर्गातील अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या गणवेषाचा शिलाई दर, धुलाई भत्ता तसेच चामडी बुटाच्या व वुलन जर्सीच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून दक्षता संवर्गातील अधिकाऱ्यांच्या गणवेष शिलाई, धुलाई भत्ता तसेच चामडी बुटाच्या व वुलन जर्सी इत्यादिंच्या दरामध्ये खालील तक्त्यातील रकाना क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | सध्याचा प्रचलीत दर रक्कम रुपये | वाढीव दर रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | गणवेष शिलाई खर्च | ५००/- (२ जोडी गणवेषासाठी २ वर्षासाठी) | १०००/- (२ जोडी गणवेषाकरिता २ वर्षातून एकदा) |
| २. | गणवेष धुलाई भत्ता | ५०/- (दरमहा) | १००/- (दरमहा) |
| ३. | चामडी बुट (ब्राऊन लेदर) | ८००/- (प्रतिवर्षी प्रति जोडी) | १०००/- (प्रतीवर्षी प्रती जोडी) |
| ४. | वुलन जर्सी | ३००/- (२ वर्षासाठी) | ६००/- (२ वर्षातून एकदा) |
| ५. | खाकी रंगाचे नायलॉन पायमोजे | - | २४०/- (४ जोडी २ वर्षातून एकदा) (प्रती जोडी रु.६०/-) |

३. उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या वाढीव दराची अंमलबजावणी सन **२०१०-११** पासून करण्यात येईल.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु.य.पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत :
म.रा.वि.वि.कं.मर्यादितच्या विभागीय कार्यालय स्तरापर्यंत.

*K/Adm.Cir.- Uniform*